गरम दूध अंगावर सांडून चिमुकलीचा मृत्यू

लोकसत्ता वार्ताहर

बीड : कुत्रा अंगावर धावून आल्याने घाबरून जीव वाचवण्यासाठी पळणाऱ्या एका तीन वर्षांच्या चिमुकलीचा चुलीवरील उकळते दूध अंगावर सांडून मृत्यू झाला. ही घटना बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथे गुरुवारी घडली आहे. दुर्गा असे या मृत मुलीचे नाव आहे. दसऱ्याच्या दिवशीच दुर्गाचा वाढदिवस थाटात साजरा करण्यात आला होता.

घटनेवेळी दुर्गा ही आपल्या घरासमोर खेळत होती. त्याच वेळी अचानक एक भटका कुत्रा भुंकत तिच्या अंगावर धावून आला.

घाबरलेल्या अवस्थेतच दुर्गा घराकडे पळताना अंगणात चुलीवर ठेवलेल्या उकळत्या दुधाच्या पातेल्याला तिचा धक्का लागला. यात पातेल्यातील गरम दूध तिच्या संपूर्ण अंगावर सांडल्याने ती गंभीररीत्या भाजली गेली.

तिला उपचारासाठी बीड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी तिला बीडच्या जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली.

संत चोखामेळा साहित्य संमेलन उत्साहात

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : संत नामदेव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या नर्सीमध्ये दोन दिवसीय तिसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन शनिवारी व रविवारी उत्साहात पार पडले.

उद्घाटनप्रसंगी माजी सनदी अधिकारी व संत साहित्याचे अभ्यासक इंद्रजित देशमुख म्हणाले, सत्तेच्या खुर्चीवर बसलेली माणसे काळाच्या ओघात 'माजी' होतात; मात्र संतांचे विचार, साहित्य कधीच कालबाह्य होत नाही. समाजात विकृती व द्वेषाचे विष पसरत असताना संतांची अभंगवाणी त्याची धार बोथट करते. माणसामाणसांतील दुरावा मिटवून समाजमन जोडण्याचे आणि विकृतींना पराभूत करण्याचे सामर्थ्य संत साहित्यातच आहे. त्यामुळे समाजाचे विघटन रोखून समृद्ध जीवनमूल्यांची पुनर्स्थापना करण्यासाठी संत साहित्याचा जागर ही काळाची गरज आहे.

आळंदी येथील संत चोखामेळा अध्यासन केंद्र, पुणे येथील वृंदावन फाऊंडेशन आणि श्री संत नामदेव महाराज संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे संमेलन पार पडले.

यावेळी संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये, महंत भारत महाराज जाधव, संत नामदेव संस्थांचे सचिव द्वारकादास सारडा, संचालक मनोज आखरे, सचिन पाटील, डॉ. रमेश शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. शंकर पजई यांनी केले. सूत्रसंचालन गणेश येवले यांनी केले, तर डॉ. किशोर इंगोले यांनी परिचय करून दिला.

महात्मा फुले राष्ट्रीय साहित्य महोत्सव डिसेंबरमध्ये

मराठवाडा साहित्य परिषदेची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीचे २०२६-२७ हे वर्षे असून, त्यांचे क्रांतिकारी योगदान व कार्याचा वेध घेण्यासाठी २५ ते २७ डिसेंबर असा तीन दिवसीय राष्ट्रीय साहित्य महोत्सव आयोजित करण्यात आल्याची माहिती मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी दिली.

या साहित्य महोत्सवाचे उद्घाटन मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्याचा परिषदेचा मानस आहे. या समारंभास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी हे राहणार आहेत. समारोप शिरूरचे खासदार तथा अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत होणार असून, या कार्यक्रमाचे निमंत्रण डॉ. कोल्हे यांनी स्वीकारल्याचे ठाले पाटील यांनी सांगितले.

'महात्मा फुले : पर्यायी विचारदृष्टी, चिकित्सा आणि विद्यमान महाराष्ट्र' हे सूत्र घेऊन चर्चासत्राची आखणी केली असून, महोत्सवानंतर हे सर्व निबंध, झालेली निवडक चर्चा एकत्र करून यांचा एक ग्रंथ प्रकाशित करण्याची साहित्य परिषदेची योजना आहे.

या चर्चासत्रासाठी उद्घाटक व समारोप मिळून एकूण ३७ अभ्यासकांना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यातील मराठवाड्यातून १४ अभ्यासक आहेत.

कोकणातून मराठी भाषा मंत्र्यांसह तीन, खानदेशातून १, वाई-सातारा, नाग-विदर्भातून प्रत्येकी दोन, नगर-संगमनेरमधून १ तर कोल्हापूरमधून पाच अशी निमंत्रितांची विभागणी असेल. त्यात एकूण चार स्त्री अभ्यासक आहेत. या संख्येत कमी-अधिक बदल होऊ शकतो, असेही ठाले पाटील यांनी सांगितले.

पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे जवाहरनगर ठाण्याविरुद्ध धाव

दोन महिन्यांत निर्णय घेण्याचे खंडपीठाचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे जवाहरनगर पोलिसांविरुद्ध केलेल्या तक्रारीवर दोन महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायाधीश वैशाली पाटील-जाधव यांनी दिले.

याप्रकरणी नीरज प्रदीप चुडीवाल यांनी २३ जुलै २०२६ रोजी प्राधिकरणाकडे तक्रार दाखल केली होती. नियमांनुसार अशा तक्रारींवर ९० दिवसांच्या विहित मुदतीत चौकशी करून अंतिम निर्णय घेणे बंधनकारक असते. मात्र, तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही संबंधित पोलिसांना साधी नोटीसदेखील बजावण्यात आली नव्हती. प्राधिकरणाच्या या संथ कारभारामुळे तक्रारदाराने अॅड. प्रियांका जाधव आणि अॅड. प्रियांका सरनाईक यांच्यामार्फत औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. याप्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी न्यायालयात सुनावणी झाली.

प्राधिकरणाकडे अन्य तक्रारीही प्रलंबित असल्याने निर्णय घेण्यास विलंब झाल्याचे सरकारी वकील एम.एस. भोसले यांनी न्यायालयात सांगितले. याची नोंद घेत न्यायालयाने पोलीस प्राधिकरणाला आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांत तक्रारीवर नियमानुसार अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

हिंगोलीत दोन हळद उद्योगांचे परवाने निलंबित

एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : अस्वच्छता आणि अन्न सुरक्षा कायद्याच्या निकषांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अन्नपदार्थ उत्पादकांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून, वसमत तालुक्यात दोन दिवसांत दोन हळद प्रक्रिया उद्योगांवर छापे टाकून तब्बल एक कोटी रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर वरील दोन्ही उद्योगांचे परवाने निलंबित करण्यात आले. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर ही धडक कारवाई करण्यात आली.

एफडीएचे सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त पवन खताळ व अन्न सुरक्षा अधिकारी तुषार घोपे यांच्या पथकाने कुरुंदा येथील एका हळद प्रक्रिया उद्योगावर छापा टाकला. तपासणीत अस्वच्छता आढळल्याने हळदीचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आणि ४० लाख रुपयांची हळद जप्त करण्यात आली. यानंतर शुक्रवारी (दि. २३) वसमत येथील उद्योगाचीही तपासणी करण्यात आली. तेथेही स्वच्छतेचे आणि अन्न सुरक्षा कायद्यातील निकषांचे पालन होत नसल्याचे आढळले. त्यामुळे ६० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

सण-उत्सवांच्या काळात मसाल्यांच्या पदार्थांचा वापर वाढतो. त्यामुळे खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता याबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम तीव्र केली आहे. किराणा दुकाने, हॉटेल्स आणि अन्नपदार्थ उत्पादकांच्या आस्थापनांमधील साठ्याची तपासणी करून नियमभंग आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देश वरिष्ठ स्तरावरून देण्यात आले आहेत.

Shri Jain Vidya Prasarak Mandal's

Rasiklal M Dhariwal Institute of Pharmaceutical Education and Research

Chinchwad Pune, (Celebrating 100 years of SJVPM Establishment)

Approved by PCI | DTE Code: PH6823 | SPPU | Accredited with NAAC A+ Grade with CGPA 3.46

(Affiliated to Savitribai Phule Pune University, Approved by PCI)

ADMISSIONS OPEN FOR **B.Pharm & M.Pharm**

Applications are invited from eligible candidates for admission to

First Year B.Pharm | First Year M.Pharm

(Pharmaceutical Chemistry, Pharmaceutics, Pharmaceutical Quality Assurance) for institute level quota and probable vacancies after CAP rounds.

Eligibility: Passed HSC PCB/PCM for B.Pharm and M.Pharm with non-zero MHT-CET / NEET/Valid GPAT score, as per the rules and regulations of Govt. of Maharashtra.

Application Forms are Available at the college office. Last date to submit filled application form is 27/10/2026.

Chairman - SJVPM | Hon. Gen. Secretary - SJVPM | Principal - RMDIPER

Contact us : 9403171201 / 98226 92401 / 7058707091, Website: www.rmdiper.com

पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा

लोकसत्ता वार्ताहर

बीड : तालुक्यातील बालापूर शिवारात सुरू असलेल्या पवनचक्की प्रकल्पाच्या कामात अडथळे आणून कंपनीकडे १० लाख रुपयांची खंडणी मागून काम सुरू ठेवल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टोरेंट सोलर पॉवर लिमिटेड कंपनीकडून बालापूर येथील गट क्रमांक ३०९ मधील जमिनीवर पवनचक्की प्रकल्पाचे काम सुरू आहे. या कामासाठी संबंधित जमीन भाडेपट्ट्याने घेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, काही जणांनी संगनमत करून प्रकल्पाच्या कामात अडथळे आणल्याचा आरोप कंपनीने केला आहे.

तक्रारीनुसार, संबंधितांनी जमिनीवर अनधिकृत शेती सुरू असल्याचे भासवून तसेच जुन्या कराराचा मुद्दा उपस्थित करून प्रकल्पाचे काम बंद पाडल्याचा आरोप आहे. काम पुन्हा सुरू करण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. पवनचक्की प्रकल्पासाठी लागणाऱ्या क्रेनसह अन्य यंत्रसामग्रीचे काम थांबले. परिणामी, कंपनीचे सुमारे ७० ते ८० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करून या प्रकारामुळे या प्रकल्पावरील कर्मचारी आणि कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी महादेव बाजीराव जाधव, कृष्णा महादेव जाधव, गणेश महादेव जाधव, अविनाश परमेश्वर जाधव (सर्व रा. बालापूर), सीमा विशाल अंधारे (रा. भांडगाव, ता. भूम), सोपान मोरे (रा. बीड) आणि अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Classifieds

जमीन विकणे आहे

६ एकर उपजाऊ कृषी जमीन विक्रीस- वडनेर- पार्नेर, अहमदनगर. मालक- ९८१९३८०२०२.

0071067443-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत पत्ता: ११ वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३.
शाखेचा पत्ता: टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, दुसरा मजला, कानडी टॉवर, सी विंग, जालना रोड, औरंगाबाद -४३१००१

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) व नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी १५ दिवसांची ई-लिलाव सूचना.

याद्वारे आम जनतेस आणि कर्जदार/सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस/ प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल) यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल)** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी दि. १३-११-२०२६ रोजी **"जशी आहे जेथे आहे" व "जशी आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथेच आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्रीपुढे ढकलण्यात/खंडित करण्यात न आल्यास, सदर अनामत मत्ता/मालमत्तेची **दि. १३-११-२०२६ रोजी दु. २ वाजता ई-लिलावाद्वारे** विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा **१२-११-२०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत** पर्यंत शाखेच्या पत्त्यावर म्हणजे **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, दुसरा मजला, कानडी टॉवर, सी विंग, जालना रोड, औरंगाबाद -४३१००१** येथे टीसीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पोचावयास हवा.

अनामत मत्ता/ अचल मालमत्तेची विक्री "जशी आहे जेथे आहे" तत्त्वावर खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार करण्यात येईल:

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/कायदेशीर वारस/कायदेशीर प्रतिनिधी/ जामीनदारांचे नाव	मागणी सूचनेची तारीख	आरक्षित किंमत	या दिनांकास थकबाकी रक्कम
1	9641219 & 9651114	बबन मुरलीधर वेलदोडे, लक्ष्मी बबन वेलदोडे	Rs.17,88,768/- 11-01-2018	रु. १५,००,०००/- बयाणा रक्कम रु. १,५०,०००/- ताब्याचा प्रकार प्रत्यक्ष	Rs.65,31,927/- 19-10-2026

अचल मालमत्तेचे वर्णन: परिशिष्ट अ: "सारा परिवर्तन" या गृह प्रकल्पात, प्लॉट क्र. ६५,६६,६७, एकूण क्षेत्रफळ सुमारे ११९७८.४५ चौ.मी. (प्लॉट क्र. ६५, क्षेत्रफळ सुमारे ३९९४.६५ चौ.मी., प्लॉट क्र. ६६, क्षेत्रफळ सुमारे ३९९१.३० चौ.मी., प्लॉट क्र. ६७ क्षेत्रफळ सुमारे ३९९२.५० चौ.मी.) भाग आणि सेक्टर 'सी', गट क्र. २३४/२ मधील, गाव सावंगी, तह. जिल्हा औरंगाबाद. चतुःसीमाः पूर्वेस- गट क्र. २६१ ची जमीन, पश्चिमेस- १२ मी. रुंद अंतर्गत रस्ता, दक्षिणेस- प्लॉट क्र. ६३, ६४, उत्तरेस- खुली जागा आणि अमेनिटी प्लॉट क्र. ए.

परिशिष्ट ब: सदनिका क्र. ०७, स्टील्ट दुसरा मजला, विंग २३ए, बिल्डिंगचे चटई क्षेत्रफळ सुमारे ४४.०२ चौ.मी., बिल्ट-अप क्षेत्रफळ ४२.८७ चौ.मी. इमारतीच्या मंजुरीनुसार. "सारा परिवर्तन" च्या सेक्टर सीमध्ये, गट क्र. २३४/२ वर बांधलेले, क्षेत्रफळ सुमारे ११९७८.४५ चौ.मी., गाव सावंगी, तह. आणि जिल्हा औरंगाबाद, नोंदणी उप-निबंधक कार्यालय औरंगाबाद यांचेकडे, चतुःसीमाः पूर्वेस- अप्रोच, पश्चिमेस- सदनिका क्र. १० विंग-२३, उत्तरेस- सदनिका क्र. ०८, विंग २३, दक्षिणेस- सदनिका क्र. ०८, विंग २३.

टीप: बोलीदारांनी बोली सादर करण्याअगोदर योग्य ती खबरदारी घ्यावी. हा लिलाव सदर वादाच्या निकालाच्या अधीन असेल.

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तिशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.

सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, २००२ मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल:

सूचना: मालमत्तांचा ई-लिलाव हा दिनांक १३-११-२०२६ रोजी दु. २.०० ते ३.०० वाजेपर्यंत https://auctionbazaar.com या पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी ५ मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.

अटी व शर्ती:

१. खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत काही चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास ती अचल मालमत्ता सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. २. सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. ३. बोली वृद्धी रक्कम **रु. १०,०००/-** (रुपये दहा हजार फक्त) असेल. ४. सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील **"टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."** यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. बयाणा रकमेचा एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएस द्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएसच्या माध्यमातून बयाणा रक्कम जमा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. ५. सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास लॉटचा खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार "प्राधिकृत अधिकाऱ्यास" असेल. ६. नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा/खंडित करण्याचा अधिकार "प्राधिकृत अधिकाऱ्या"स असेल. ७. आधीच वेळ घेऊन **०५-११-२०२६ रोजी स. ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत** मालमत्तेची पाहणी करता येईल. ८. यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या २५ टक्के रक्कम "प्राधिकृत अधिकाऱ्या"कडे २४ तासांच्या आत जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात/खाजगी वाटाघाटीद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. ९. वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत "प्राधिकृत अधिकाऱ्या"कडे जमा करावी लागेल किंवा १५व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. १०. वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** द्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्रीकरण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. ११. मालमत्तेवरील टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना ज्ञात असलेले बोजेः वरील मालमत्तेच्या वर्णनात नमूद केल्याप्रमाणे. मालमत्तेवरील दावे आणि तिचे स्वरूप व मूल्य यावर परिणाम करू शकणारा इतर तपशीलः वर नमूद केल्याप्रमाणे. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ. सह वैधानिक देणी इ. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. १२. **इतर कोणताही तपशील किंवा ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार अर्का ईमार्ट प्रायव्हेट लिमिटेड, ६-३-१०९०/१/१, दुसरा मजला, भाग ब, उमा हैदराबाद हाऊस, राजभवन रोड, सोमाजीगुडा, हैदराबाद -५०००८२ ईमेल आयडी: contact@auctionbazaar.com/support@auctionbazaar.com किंवा मनीष बन्सल, ईमेल आयडी: Manish.Bansal@tatacapital.com, प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र.: ८५८८९८३६९६ यांचे मार्फत संपर्क साधू शकतात. कृपया आपले प्रश्न, शंका ९९९९०७८६६९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावेत.** १३. सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास १% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक/ कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलनची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. १४. वरील तपशिलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेली **www.https://surl.li/unyfnf** ही लिंक पाहावी. १५. कृपया ही लिंकसुद्धा पाहावी: **https://www.tatacapital.com/property-disposal.html**

कृपया लक्षात घ्यावे की टीसीएचएफएल ने या मालमत्तेच्या विक्री/लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर/एजंटची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी या संदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी,
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

स्थान: औरंगाबाद
दिनांक: २६-१०-२०२६

ताबा सूचना

ज्याअर्थी, "अॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड"चे, **आर्सिल-२०२४सी-००३-ट्रस्ट** ("आर्सिल") चे विश्वस्थ म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (२००२चा ५४) ("उक्त अॅक्ट") अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या ("उक्त रुल्स") रुल ३ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(१२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत **लोन नं.** - (खालील तालिकेत सविस्तरपणे दिल्यानुसार), त्याबाबत तपशील याखाली तालिकेत नमूद केलेला आहे.

ऋणको / हमीदार / गहाणकार उक्त रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा विशेषकरून ऋणको / हमीदार / गहाणकार तसेच आम जनतेस सूचना देण्यात आली आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी याखाली नमूद केलेल्या तारखे दिवशी **"जसे आहे जेथे आहे व जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या अंतर्निहित स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

अनु क्र.	ऋणको व हमीदाराचे नाव / ट्रस्टचे नाव / बँकेचे नाव	मागणी सूचना तपशील	ताबा तारीख
१	सुरेश शिवाजी कांबळे / जागृती सुरेश कांबळे / दिनेश शांताराम थिक ट्रस्ट : "आर्सिल-२०२४सी-००३-ट्रस्ट" ("आर्सिल") सेलिंग बँक : बंधन बँक	लोन नं. २०००४१५०००१२४६. सेक्शन १३(२) दिनांकित ३१.०७.२०२५ मागणी केलेली रक्कम रु. ११,०५,३५२.९१/-(रुपये अकरा लाख पाच हजार तिनशे बावन्न व पैसे ऐक्याण्णव फक्त) आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित १०.०७.२०२५ च्या प्रभावासापून पूर्वोक्त रकमेवरील संविदात्मक दरात भावी व्याजासह.	प्रत्यक्ष ताबा २२.१०.२०२६

मालमत्तेचे वर्णन : सुरेश शिवाजी कांबळे / जागृती सुरेश कांबळे यांच्या मालकीची मालमत्ता. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ६, बिल्डिंग नं. ए, पहिला मजला, टीजी शेट्टे नगर स्किम, प्लॉट नं. १, एरिआ मोजमापाचा ३५.५४ चौ.मी. (३८२ चौ.फू.) बिल्ट-अप ग्रामपंचायत इमला नं. ०२/२६५/ए६, मौझा कुवरबाव, तालुका व जि. रत्नागिरी आणि सदर मालमत्ता **पुढीलप्रमाणे सिमित : उत्तर :** फ्लॅट नं. ५ व कंपाऊंड वॉल, **पूर्व :** वॉल कंपाऊंड, **पश्चिम :** पॅसेज व इंटरनल रोड, **दक्षिण :** स्टेअरकेस, फ्लॅट नं. ७ व कंपाऊंड वॉल.

विशेषकरून ऋणको / हमीदार / गहाणकार तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात आले आहे की, "आर्सिल"ने वर नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा कायदेशीर ताबा घेतला आहे आणि सरफेसी अॅक्ट, २००२ च्या सेक्शन १३(१३) अंतर्गत, ऋणको / हमीदार / गहाणकार किंवा जी कोणी असेल ती कोणतीही व्यक्ती, या सूचनेच्या स्वीकृतीनंतर "आर्सिल"च्या पूर्व-लेखी परवानगीशिवाय, स्थावर मालमत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने व्यवहार / अभिहस्तांकन याद्वारा मालमत्तेचे हस्तांतरण करणार नाही आणि स्थावर मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित पूर्वोक्त रकमेवरील संविदात्मक दरातील पुढील व्याजासह वर नमूद केलेल्या रकमेकरिता "आर्सिल"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

वर नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता, उक्त अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणको / हमीदार / गहाणकारांचे लक्ष वेधीत आहेत.

स्थळ : रत्नागिरी
दिनांक : २६.१०.२०२६

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड
ट्रस्ट : "आर्सिल-२०२४सी-००३-ट्रस्ट"

अॅसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि.,
CIN : U65999MH2002PLC134884 वेबसाइट : www.arcil.co.in
नोंदणीकृत कार्यालय : दि रुबी, १०वा मजला, २९ सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८. टेलि : +९१ २२६६५८१३००
शाखा कार्यालय : युनिट नं. २११ व २१२, दुसरा मजला, प्लॉट नं. २८/२, झेनिथ कॉम्प्लेक्स, के. एम. गांधी पथ, शिवाजी नगर, पुणे-४११००५, महाराष्ट्र.

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

नोंदणीकृत कार्यालयः ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३
सीआयएन क्र. U67190MH2008PLC187552 संपर्क क्र. (०२२) ६१८२७४१४

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२च्या नियम ८(१) नुसार)

यास्तव, मी, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ३सह वाचन केलेल्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदारांना सदर नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्यासाठी खालीलप्रमाणे दिनांकाची मागणी नोटीस जारी केली.

कर्जदाराने रक्कम परतफेड न केल्यामुळे, याद्वारे विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, उक्त कायद्याच्या कलम १३(४) अन्वये उक्त नियमांच्या नियम ८सह वाचून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

याद्वारे कर्जदाराला, विशेषतः, आणि सर्वसामान्य जनतेला, मालमत्तेचा कोणताही व्यवहार न करण्याची सूचना देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार, मागणी सूचनेच्या तारखेपासून, खाली नमूद केलेल्या रकमेवर व्याज आणि दंडात्मक व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या बोज्याच्या अधीन असेल.

तारण ठेवलेल्या मालमत्तेची सोडवणूक करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८)च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

कर्ज खाते क्रमांक: TCHHL0601000100181052 आणि TCHIN0601000100186754

कर्जदार(रां)/ कायदेशीर वारस(सां)/ कायदेशीर प्रतिनिधी(धी)ची नावे: श्री. सलमान निसार सय्यद आणि श्रीमती अन्झुम रझ्झाक शेख

मागणी सूचनेची रक्कम आणि तारीख: रु. १७,९६,९६१/- (फक्त सतरा लाख शहाण्णव हजार नऊशे एकसष्ट रुपये), ०६.०८.२०२६

ताबा मिळाल्याची तारीख: २२.१०.२०२६

तारण ठेवलेल्या मालमत्तेचे/ स्थावर मालमत्तेचे वर्णन: तालुका व जिल्हा नाशिक येथील मौजे संसारी येथे, सर्व्हे क्रमांक १०/८ वर बांधलेल्या आणि एकूण अंदाजे १००० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या "मोर्या अपार्टमेंट" नावाच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर असलेला फ्लॅट क्रमांक सी-१०, ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ ५३०.०० चौ. फूट म्हणजेच ४९.३० चौ.मी. आहे, त्या मालमत्तेचा संपूर्ण भाग.

कर्ज खाते क्रमांक: 9916503

कर्जदार(रां)/ कायदेशीर वारस(सां)/ कायदेशीर प्रतिनिधी(धी)ची नावे: श्रीमती शोभा गोकुळ सांगले आणि श्री. गोकुळ भिकाजी सांगले

मागणी सूचनेची रक्कम व तारीख: रु. ११,३२,१७८/- (अकरा लाख बत्तीस हजार एकशे अठ्ठ्याहत्तर रुपये फक्त), १३.०७.२०२६

ताबा मिळाल्याची तारीख : २२.१०.२०२६

तारण ठेवलेल्या मालमत्तेचे/ स्थावर मालमत्तेचे वर्णन: नाशिक जिल्हा, तालुका नाशिक, गाव मौजे शिंदे येथे, नाशिक जिल्हा परिषद आणि तालुका पंचायत समितीच्या हद्दीत, मंजूर बांधकाम योजनेनुसार बांधलेल्या "सिद्धिविनायक पार्क" नावाच्या निवासी संकुलाच्या पहिल्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्रमांक ४, ज्याचे क्षेत्रफळ ७०० चौरस फूट (बांधकाम) म्हणजेच ६५.०६ चौरस मीटर आहे.

दिनांक: २६.१०.२०२६
ठिकाण: नाशिक

एसडी/-
प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडसाठी

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

Hinduja Housing Finance Limited

कॉर्पोरेट कार्यालय 167-169, 2रा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू).
ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

ई-लिलाव सह विक्रीसाठी सार्वजनिक सूचना (परिशिष्ट- IV A) (नियम 9(1) आणि 8(6))

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHF), **कॉर्पोरेट कार्यालय : 167-169, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015 (तामिळनाडू) आणि शाखा कार्यालय : पहिला मजला, विवेक सिंधू कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. 1, गाठाळ प्रेस रोड, जयवंती नगर, अंबाजोगाई, जि. बीड, अंबाजोगाई – 431517. शाखा कार्यालय : तिसरा मजला, सुशील बिल्डिंग, विठ्ठल मंदिर व अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या मागे, नवीन मोंढा, नांदेड – 431602.** यांचेकडे तारण असलेल्या **अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२** (यापुढे "अधिनियम") अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, HHFL च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्ज खात्यांमध्ये सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे. ही विक्री **https://www.bankauction.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून करण्यात येईल.

मालमत्तेची तपासणीची तारीख	बयाना रक्कमेची दिनांक	ई-लिलाव दिनांक / वेळ
03.10.2026 5 वाजेपर्यंत. (11.00 तास -14.00 तास)	19.10.2026 सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	20.10.2026 11:00 तास-13:00 तास

अ. क्र	कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार / कर्ज खाते क्र.	मागणी सुचनेचा दिनांक व रक्कम	अचल मालमत्तेचे वर्णन / सुरक्षित संपत्ती	ताबा दिनांक	आरक्षित किंमत
1.	1. श्री. शिवहरी यादव (कर्जदार) आणि 2. सौ. पूजा यादव (सह-कर्जदार) MH/ABJ/ABJI/A000000108	05/05/2025 रोजी 05/05/2025 रु. 24,50,395/- बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	सर्व भाग आणि तुकडा रहिवासी परिसर जि.पी हाऊस नं. 135 / 47, गट नं. 135, प्लॉट नं. 47, संपुर्ण क्षेत्रफळ 600 चौ.फुट (संपुर्ण क्षेत्रफळ 55.76 चौ.फुट) बिल्ट अप एरिया संपुर्ण क्षेत्रफळ 1800 चौ.फुट, पुर्व पश्चिम 30 फुट आणि दक्षिण उत्तर 20 फुट रा. हतवडगाव येथे स्थित, ता. माजळगाव, जि. बीड आणि संपत्ती चतुर्सिमा:- पुर्वः रोड, पश्चिमः शेळके प्लॉट नं. 44, दक्षिणः राजेभाऊ फरतडे प्लॉट नं. 47 यांचे उर्वरित भाग, उत्तरः रोड	04/08/2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 2895884/- 22/10/2026 पर्यंत	रु. 2912400/-; बयाना रक्कम रु. 291240/-
2.	1. श्री. तोसिफ पटेल (कर्जदार), 2. सौ. फातिमा पटेल (सह-कर्जदार) MH/ABJ/ABJI/A000000069	14/11/2025 रोजी 10/11/2025 रु. 32,78,579/- बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	संपत्ती चा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग प्लॉट नं. 52 आणि 53 रो हाऊस नं. 3, संपुर्ण क्षेत्रफळ (78.71 चौ.मी) संपुर्ण क्षेत्रफळ (847 चौ.फुट) (बिल्ट अप 813 चौ.फुट) सर्वे नं. 616 / 1 महानगर नं. 7 / 1575, रा कसबे अंबाजोगाई येथे स्थित, ता. अंबाजोगाई जि. बीड आणि संपत्ती चतुर्सिमा:- पुर्वः 12 मी रोड, पश्चिमः प्लॉट नं. 43 आणि 44, दक्षिणः रो हाऊस नं. 2, उत्तरः रो हाऊस नं. 4	05/08/2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 3400909/- 22/10/2026 पर्यंत	रु. 3856200/-; बयाना रक्कम रु. 385620/-
3.	1. श्री. सचिन गायकवाड (कर्जदार) आणि 2. श्रीमती शोभाबाई गायकवाड (सह-कर्जदार) MH/NDD/NDED/A000000077	19/11/2024 रोजी 12/11/2024 रु. 7,50,869/- बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा सोबतच त्यावरील बांधकाम बेअरिंग प्लॉट नं. 31 त्यापैकी गट नं. 12 संपुर्ण क्षेत्रफळ 1200 चौ. फूट (111.52 चौ. मी.) जीपीपी नं. 1036 गाव बळिरामपुर नांदेड आणि जी.पी. बळिरामपुर च्या हद्दितत, ता. आणि जि. - नांदेड. आणि मालमत्तेच्या चतुर्सिमा : पुर्व दिशेने : रस्ता, पश्चिम दिशेने : प्लॉट नं. 21, उत्तर दिशेने : प्लॉट नं. 32, दक्षिण दिशेने : प्लॉट नं. 30.	08/10/2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 854672/- 22/10/2026 पर्यंत	रु. 1558500/-; बयाना रक्कम रु. 155850/-
4.	1. श्री. मुंजाजी जाधव (कर्जदार) आणि 2. श्रीमती गिरजा जाधव (सह-कर्जदार) MH/NDD/NDED/A000000125	10/03/2025 रोजी 10/03/2025 रु. 4,73,463/- बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा सोबतच त्यावरील बांधकाम बेअरिंग ग्रामपंचायत हाऊस नं. / मालमत्ता नं. 300 / 1 संपुर्ण क्षेत्रफळ 547.8 चौ. फूट रा. देगाव बु येथे स्थित, ता. - अर्धापुर, जि- नांदेड, अर्धापुर महानगर पालिकेच्या ग्रामिण हद्दित आणि नांदेडच्या अधिकारक्षेत्रात, ता- अर्धापुर आणि जि. - नांदेड आणि मालमत्तेच्या चतुर्सिमाः पुर्वेसः रस्ता, पश्चिमेसः मंगलकार्य / लग्न हॉल, उत्तरेसः बाबुराव तिडके यांची मालमत्ता, दक्षिणेसः बाबुराव जाधव यांची मालमत्ता.	06/10/2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 529804/- 22/10/2026 पर्यंत	रु. 599300/-; बयाना रक्कम रु. 59930/-
5.	1. श्री. मिलींद गायकवाड (कर्जदार) आणि 2. श्रीमती रेखा गावयकवाड (सह-कर्जदार) आणि 3. श्रीमती विजाबाई गायकवाड (सह-कर्जदार) MH/NDD/NDED/A000000153 & CO/CPC/CPOF/A000002368	26/03/2024 रोजी 18/03/2024 रु. 6,66,658/- बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा सोबतच त्यावरील बांधकाम बेअरिंग प्लॉट नं. 42, एनडब्लुसीएमसी नं. 11-1-748 / 49 संपुर्ण क्षेत्रफळ 1170 चौ. फूट (108.37 चौ. मी.) त्यापैकी सर्वे नं. 16 / 5, गाव वसराणी नांदेड वाघाळा, एनडब्लुसीएमडब्लुसी च्या अधिकारक्षेत्रात, ता. आणि जि. - नांदेड. आणि मालमत्तेच्या चतुर्सिमा : पुर्व दिशेने : प्लॉट नं. 43, पश्चिम दिशेने : 15 फूट रुंद रस्ता, उत्तर दिशेने : 15 फूट रुंद रस्ता, दक्षिण दिशेने : प्लॉट नं. 41.	07/10/2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 529969/- 22/10/2026 पर्यंत	रु. 1785800/-; बयाना रक्कम रु. 178580/-

अधिक तपशील आणि चौकशीसाठी **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, सचिन भालेकर- 8779984037, गणेश पाटिल 9372403099, रितेश गवई- 9011858221, रुषिकेश उभाळे- 9823244498, राहुल निकुरे - 9405473208. यांचेशी संपर्क साधावा. टीप: अटी व शर्तीबाबत अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या: https://www.bankauction.com**

स्थान: अंबाजोगाई, नांदेड, दिनांक: 26/10/2026 — प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि.